स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Synopsis of the Thesis Entitles

शीर्षक

“महाराष्ट्रातील आदर्श गाव पुरस्कारप्राप्त गावांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान शाखेतील

समाजशास्त्र विषयात पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा

शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

बालाजी नरवटे

मार्गदर्शक

डॉ. अनिलकुमार जायभाये

समाजशास्त्र विभागप्रमुख

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

उप परिसर, लातूर

ऑगस्ट - २०२३

महाराष्ट्रातील आदर्श गाव पुरस्कारप्राप्त गावांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना:

भारतीय समाजाचा विकास हा अनेक स्थित्यंतरांमधून होत असल्याचे आपणास दिसून येते. भारतात अनेक वर्षे ब्रिटिशांची सत्ता होती. त्यांची पिळवणूक, जुलमी सत्ता यामुळे भारतीय विकासात अनेक अडथळे निर्माण झाली होती. स्वातंत्र्यानंतर भारतात अनेक प्रश्न निर्माण झालेली होती. ते सोडवण्यासाठी देश पातळीवर अनेक प्रकारचे प्रयत्न चाललेली होती. स्वातंत्र्य भारताला विकसित करण्यासाठी अनेक योजना, विकास कार्यक्रम, धोरणे अवलंबण्याचे काम चालू होते. त्याच धर्तीवर भारतात पंचवार्षिक योजनांची निर्मिती करण्यात आली होती.

आजच्या नवउदारमतवादी राजकीय अर्थव्यवस्थेत राज्य शासनाचे स्वरूप अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. समकालीन समाज समजून घ्यायचा असेल तर ही गुंतागुंत व त्या अनुषंगाने झालेले बदल जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी हे लक्षात घेतले पाहिजे की, या नवउदारमतवादी व्यवस्थेत सर्व देशाचे राष्ट्रीय राजकारण बाजारकेंद्री असल्यामुळे शासन आंतरराष्ट्रीय बाजार शक्तीनुसार आपले राष्ट्रीय राजकारण बदलत असते. यात शासनाला एका बाजूला लोकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करावी लागते तर दुसऱ्या बाजूला जागतिक भांडवली शक्तींचे हितसंबंध जपावे लागतात. या नव उदारमतवादी अर्थव्यवस्थेत शासनाला केवळ 'बाजार संवेदनशील' असून चालत नाही तर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या जाचक मागण्या पूर्ण कराव्या लागतात. या व्यवस्थेत सत्ता संतुलन हे नागरीकांकडून जागतिक भांडवलाकडे हस्तांतरित झाले आहे. आता सत्तेतील बदल मतदार नव्हे तर राष्ट्रीय सीमाबाहेरून येणारे भांडवल घडवून आणत आहेत (Leys, 2003).

सध्या सर्वच राष्ट्रातील उत्पादनाच्या सामाजिक संबंधांची पुनर्रचना होताना दिसून येते. भारतात १९९१ च्या नंतर LPG ची सुरुवात झाली आणि PPP चा हस्तक्षेप वाढला आणि त्यामुळे शासनाचा सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग कमी होऊन त्या ठिकाणी खाजगी मालकी निर्माण होत आहे. शासनाचे घाटात जाणारे उत्तरदायित्व समाजातील सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण करते. सामाजिक सुरक्षितता म्हणजे गरीब व संवेदनशील समाजघटकांच्या जीवनात होणाऱ्या आकस्मिक बदलांपासून संरक्षण करण्याच्या हेतूने शासन व्यवस्थेकडून केली जाणारी सार्वजनिक कृती होय. ज्यात रोजगार आणि उत्पन्नाची हमी, पतपुरवठयाच्या सुविधा, सामाजिक विमा, बेकरी भत्ता, निवृत्ती वेतन अशा लाभांचा समावेश होतो (Ahmad, 1991). नवउदारमतवादी व्यवस्थेत सामाजिक उत्तरदायित्वपासून दूर जाणारी शासन व्यवस्था जेंव्हा सामाजिक सुरक्षिततेचा उपक्रम हाती घेते तेंव्हा द्वंद्वात्मक परिस्थिती निर्माण होते. जिचे विश्लेषण करण्यासाठी नव्या दृष्टीकोणातून मांडणी होण्याची आवश्यकता अधोरेखित होते. नवउदारमतवादी व्यवस्थेत व्यक्ती स्वतःच आपल्या कल्याणसाठी जबाबदार मानला जातो. आजमितीस शासन कल्याणकारी स्वरूपापासून दूर जात आहे. जबाबदारीच्या तत्वापासून विलग होत आहे. पण त्याचवेळी शासन व्यवस्था व्यक्तीच्या कल्याणाच्या योजना राबवताना दिसून येते. नव्याने राबवण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचे असे आहे की, या योजना लाभार्थी केंद्री, लोकसहभागाधारित, पर्यावरणपूरक, स्थानिक ज्ञानाधारीत, चिरंतन स्वरुपाच्या आहेत.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारततातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ही खेड्यांमध्ये आजही वास्तव्य करत आहे (census 2011, India). भारताचा शहरी भाग आणि ग्रामीण भाग अशा दोन भागात विभाजन आपल्याला दिसून येते. आजही आपल्याला देशाचा दुसरा भाग अविकसित असल्याचे दिसून येते. भारताचा विकास साधायचा असेल तर एवढ्या मोठ्या प्रमाणातील लोकांना वगळून चालणार नाही. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात भारताने कृषी, औद्योगीक विकासाबरोबरच ग्रामीण विकासावरही भर दिलेला आहे. ग्रामीण विकासाचा उद्देश हा अज्ञानी व गरीब लोकांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि मानसिक वागणुकीमध्ये बदल घडवून ग्रामीण लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे हा आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे आणि जास्तीत जास्त शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे शेतीचा विकास होताना दिसून येत नाही. ग्रामीण भागातील विकासासाठी शासन पातळीवर अनेक योजना चालू आहेत.

ग्रामीण स्तरावरील जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय स्तरावर पाठबळ देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध प्रयत्न केले. ग्रामीण विकास योजनांद्वारे रोजगार निर्मिती, स्वच्छता, पाणी, आरोग्य, शिक्षण, घरकुले, रस्ते, दळण-वळण व वीज इत्यादींसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र सरकारतर्फे सुरू करण्यात आलेल्या रोजगार हमीचे योजनेचे कौतुक करण्यात आले व याच मॉडेलवर आधारित राष्ट्रीय स्तरावर ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना’ देशभर सुरू करण्यात आली. तसेच संत गाडगेमहाराज ग्राम स्वच्छता अभियान महाराष्ट्र सरकारने चांगल्या पद्धतीने राबविल्यामुळे केंद्र सरकारनेही याच धर्तीवर संपूर्ण देशात स्वच्छता अभियान ही योजना सुरू केली. त्याचबरोबर महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेंतर्गत अनेक गावात आर्थिक निकषावर दलित व आदिवासी कुटुंबांना घरकुले दिली आहेत. ग्रामीण भागातील लोकांना पेयजल व पाणीपुरवठा योजना राबवून आरोग्यासाठीही योजना राबविल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना, सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनाही राबविली आहे. आरोग्य अभियान, संपूर्ण स्वच्छता अभियान, दुर्गम भागातही पोहोचले आहे. दलित वस्ती सुधार योजना, कुटुंब कल्याण योजना, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, शालेय पोषण आहार योजना, निर्मल ग्राम योजना, सर्व शिक्षा अभियान व रेनवाटर हार्वेस्टिंग अशा विविध योजना महाराष्ट्रात ग्रामीण विकासासाठी सुरू आहेत. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकासासाठी “आदर्शगाव’ योजनेची सुरुवात केली. पुढे ही योजना केंद्र सरकारने २०१४ मध्ये सांसद आदर्श ग्राम योजना या नावाने चालू केली आहे.

आदर्शगाव योजना ही गावातील जलसंधारणाची गाभा क्षेत्रातील काम करणारी महत्वाची योजना असली तरी या योजनेचा गाभा मात्र आदर्श गावातील माणूस आहे. आदर्श गावातील पाळली जाणारी पंचसूत्री/सप्तसुत्री (नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, लोटाबंदी, बोअरबंदी व श्रमदान) त्या गावातील माणसांतील माणूसपणा जागे करण्याकरिता त्या गावातील माणसांमध्ये अस्मिता जागृत करून त्यांच्या विचारात सामाजिक बांधीलकीचे परिवर्तन घडवून आणणे हाही या योजनेचा प्रमुख हेतु आहे. स्वयंपूर्ण खेडे बनविण्याचे काम या योजनेने स्वीकारलेले आहे. आपल्या गावाची विकास योजना आपल्या गावात आपण बसून बनवावी, आपणच आपल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत या योजनेची अंमलबजावणी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने सर्व ग्रामस्थांच्या सहभागाने व

श्रमदानाच्या माध्यमातून पूर्ण करणे त्यासाठी पाणलोट विकास, मृदासंधारण, जलसंवर्धन, शेतजमीन विकास, गावविकास, रस्ते, दळण-वळणाच्या सोयीसुविधा, बारमाही पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पंचायतराज संस्थेचे (विशेषत: ग्रामसभा) बळकटीकरण. विकासाच्या आरोग्य, शिक्षण ई. क्षेत्रात गुणवत्ता वृद्धी, महिला, युवक, युवती बालके व वृद्धासाठीच्या विविध योजनांची परिपूर्ण अंमलबजावणी, सामाजिक एकात्मता, धार्मिक सहिष्णुता यासह सामाजिक न्यायाच्या सर्व उदात्त तत्वाचे पालन उदा. हुंडा न घेणे, एड्स चाचणी प्रतिज्ञा, नक्षत्र वन निर्मिती ई. ग्रामविकासाच्या सर्व विषयामध्ये लोकसहभाग तसेच श्रमदान यासह सातत्याने सर्व सप्तसुत्रींची काटकोरपणे अंमलबजावणी आणि उपलब्ध पाण्यावर आधारित पिकांचे नियोजन, कृषी व कृषीआधारित उपजीविकांच्या साधनाची निर्मिती, तंटामुक्ती, आपत्तीमध्ये वेळेवर ग्रामस्थांचे सहकार्य, स्वच्छता, नवसाक्षरता, जलसाक्षरता, गटार व्यवस्था, ग्राम आरोग्य, बायो व गोबर गॅस हा पर्यायी इंधन कार्यक्रम, जीवन शिक्षण, आदर्श सुधारित शेती, अस्पृश्यता व अंधश्रद्धा निर्मूलन, एक गाव एक परिवार योजना, सामाजिक विकास, लोकविकास, शासन सेवांचा समतोल समन्वय, आणि नेतृत्व गुणाचा विकास या सर्व कामांचा समावेश आदर्श गाव योजनेत सहभागी गावांच्या विकास आराखड्यात समाविष्ट असायला हवे (गौतमी, २०१०; मार्गदर्शिका, २०१५; शासन निर्णय, २०१०, २०१५). आदर्शगाव योजना ही जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास आणि सप्तसुत्री यावर मुख्यतः अवलंबून असल्याचे दिसून येते.

साहित्याचे पुनरावलोकन:

सदर संशोधन आराखडा तयार करण्यासाठी भारतीय खेडे, ग्रामीण विकास आणि आदर्श ग्राम योजेनेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे संदर्भ साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

खेड्यांविषयीचे मत:

भारताच्या आजपर्यंतच्या इतिहासात गाव हे सर्वव्यापी आणि सुगम मानवी वसाहत राहिलेले आहे. गाव हे मानवी संस्कृतीच्या विकासाच्या वाटचालीतील प्रगत टप्पाच नव्हे तर संस्कृतीचे एक सूक्ष्म रूप म्हणून पुढे आले आहे. एक संस्था म्हणून गावाचा विचार केला तर गाव हे खूप पुरातन आहे. भारताच्या संदर्भात विचार केला तर गाव धर्मशास्त्राएवढे पुरातन असल्याचे संदर्भ सापडतात. आधुनिकपूर्व कृषि समाजात गाव हे एक अक्ष होते ज्याभोवती बहुतेक सर्व मानवजातीचे दैनंदिन जीवन आकार आणि अर्थ प्राप्त करत असे. गाव हे गावकऱ्यांचे काम आणि आराम करण्याचे ठिकाण होते. हेच गावकऱ्यांचे संस्कार, सण, उत्सव, स्मरणोत्सव साजरा करण्याचे ठिकाण होते. गावाच्या शीवेच्या आतच सर्व सामाजिक आंतरक्रिया पार पडत असतं. S. C. Dube आपल्या Indian Village या ग्रंथात ऋग्वेद कालीन समजाचा विकास कुटुंबातून ग्रामाची निर्मिती किंवा आधी कुटुंब नंतर ग्राम नंतर जन (समुदाय) व नंतर राष्ट्र या क्रमाने झाला या विकासात ग्रामचे स्थान महत्वाचे आहे असे प्रतिपादन करतात (Dube, 1955). असे असले तरी १९ व्या शतकातच गाव या संकल्पनेकडे साहित्यिक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते यांचे लक्ष वेधले गेले.

आजसुद्धा गाव एक सामाजिक एकक म्हणून गावातील लोक व अभ्यासक/निरीक्षकांसाठी महत्वाचे आहे. गाव ही संकल्पना अनेक मूलभूत बदलातून गेलेली आहे. आज शासनाच्या विविध विभागामार्फत केल्या

जाणाऱ्या अनेक सर्वेक्षण व जनगणनेच्या वर्गीकणाचे एकक म्हणून गावास गणले जाते. त्याबरोबरच शासन पुरस्कृत राजकीय विकेंद्रीकरणाचा आधारही गावच होते.

समाजशास्त्रज्ञांसाठी गाव हे क्षेत्राभ्यासाचे अलिप्त घटक, आणि महत्वाचे म्हणजे समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ यांच्या प्रखर गुणवत्तापूर्ण अभ्यासाची विषयवस्तू ही गावचा राहिलेली आहे. इतर कुठेही झाले नाहीत एवढे ग्रामाभ्यास (Village Studies) भारतात झाले पण त्यातून गावाबद्दलची समज स्पष्ट होण्याऐवजी संदिग्धतेतच भर पडली.

१९व्या शतकातील ब्रिटीश महसूल अधिकारी Sir Henry Maine आणि Baden-Powell यांनी आपल्या वसाहत अहवालात भारतातील गावांच्या स्वरूप आणि कार्यप्रणालीवर भर दिला. गाव संकल्पनेस वसाहतीक कालखंडातील उदयाचा इतिहास आहे. गाव ही संकल्पना ब्रिटीश प्रशासनास प्रशासकीय नियंत्रणासाठी सुनिश्चित प्रादेशिक गट म्हणून उपयुक्त ठरली. गावाची वसाहतीक रचना ही काही केवळ भारतासाठीच विशेष नव्हती तर इतर वसाहतीक राष्ट्राप्रमाणे गाव ही संकल्पना भारतावरील अमलाच्या योजनेचा एक भाग होते, ज्याचे अंतिम उद्दिष्टे गाव आणि राज्याचे संबंध तयार करणे हे होते. शिवाय तत्कालीन मुख्यप्रवाही पौर्वात्यवादाने (Orientalism) आशियाई ग्रामव्यवस्थेला पूर्वेचा मैलाचा दगड बनवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. तेंव्हापासून पौर्वात्य आणि त्यांच्या संस्था समजून घेण्यासाठी गाव एक माध्यम समजले जाऊ लागले. त्यांचा परिपाक म्हणजे भारतात १९व्या शतकाच्या सुरूवातीला प्रतींनिधिक वैचारिक (Normative-Ideological) गर्भितर्थाचा समुच्चय म्हणून गावाकडे वसाहतकर्ते आणि वसाहतीक दोघेही पाहू लागले. गाव हे आता भारतीय समाजाचे प्राचीन आणि मुख्य केंद्रबिंदू बनले.

गाव या संकल्पनेस वसाहतकालीन उदयाची पार्श्वभूमी आहे. Berman यांच्या मतानुसार वसाहतकर्त्यांनी गावाची तीन वैशिष्ट्ये सांगितली १. गाव-भारतीय समाजाचे प्राथमिक आणि पुरातन एकक आहे. २. गाव-स्वायत राजकीय-प्रशासकीय गट. ३. गाव- आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण घटक (Berman, 1997). वसाहतीक ब्रिटीश प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लिखाणातून भारत म्हणजे खेड्यांचा देश आणि ही खेडी म्हणजे स्वतंत्र गणराज्य आहेत. जी प्राचीन भारतीय समाजाचे सामाजिक- संस्कृतिक एकक असून ती कसल्याही प्रकारच्या बाह्य प्रदूषणापासून मुक्त आहेत अशीच मांडणी केली गेली (Mines and Yazgi, 2010).

राष्ट्रीय नेत्यांच्या कल्पनेतील गाव:

गावाच्या संदर्भात विवेचन करत असताना राष्ट्रीय नेत्यांच्या नजरेतून गावाकडे पाहणे महत्वाचे राहील यामध्ये गांधीजी, पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार महत्वाचे आहेत.

महात्मा गांधी:

आज ग्रामीण भागातील जनता मोठ्या प्रमाणात शहराकडे स्थलांतर करत आहे. गांधीजींनी लोकाना खेड्याकडे चला असे आवाहन केले होते. त्यासाठी त्यांनी खेड्याचा विकास व्हावा हा आग्रह धरला होता व आदर्श गाव कसे असावे हे त्यांनी “स्वराज व्हिलेज” मधून सांगितले होते. त्यांच्या मते “भारतीय आदर्श गाव असे असावे की त्यामध्ये प्रत्येकाला घर, घराला पुरेल असा प्रकाश, घरासमोर अंगण, अंगणात त्यांना पुरेल असा भाजीपाला आणि घरगुती प्राण्यांना राहण्याची व्यवस्था असे. तसेच गावापासून ५ मैलाच्या आत व्यक्तींच्या गरजेच्या वस्तू सहज उपलब्ध झाल्या पाहिजे. गावात प्रार्थना स्थळ, सार्वजनिक बैठकीची जागा,

जनावरांना चारण्यासाठी सार्वजनिक चराई क्षेत्र, गावात सहकारी दुग्ध व्यवसाय, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध असावी आणि पंचायत गावातील तंटे(वाद) मिटवण्याचे कार्य करेल. आणि गावातील व्यक्तीने स्वतः धान्य, पालेभाज्या, फळे आणि खादीचे उत्पादन केले पाहिजे"(हरिजन, जानेवारी ९, १९३७).अशा प्रकारे गांधीजींनी खेड्यांविषयीचे विचार मांडले आहेत.

गांधींसाठी खरा भारत हा खेड्यांमध्ये वसला आहे. खेडे हे भारतीय संस्कृतीचे प्रभेदक/प्रमुख घटक आहे. गांधींसाठी भारत हा खेड्यातच सुरू होतो आणि संपतोही. गांधींच्या खेड्यासंबंधीच्या विचारांवर पाश्चातांच्या पौर्वात्यवादी रंजक कल्पनांचा प्रभाव होता. गांधींनी पाश्चात्य आधुनिकतावादावर टीका करून खेड्यांसंबंधी सुधारणावादी दृष्टीकोण स्वीकारला. गांधींच्या मते, खरे रामराज्य/ग्रामराज्य आणायचे असेल तर तो खेड्यांच्या विकासातून शक्य आहे. त्यासाठी खेड्यांना स्वयंसिद्ध, स्वावलंबी, स्वयंपूर्ण बनवले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या मते, भारताचा विकास हा पूर्णपणे भारतातील खेड्यांवर अवलंबून आहे (Jodhka, 2002).

पं. जवाहरलाल नेहरू:

नेहरू खेड्याचे अस्तित्व मान्य करतात पण त्यांच्यासाठी खेडी म्हणजे भारताच्या पारंपारिक व मागासलेपणाचे लक्षण आहे. जे त्यांच्या स्वप्नातील आधुनिक औद्योगिक भारताच्या स्वप्नात बसत नाही. नेहरू गांधींप्रमाणे खेड्यांच्या पुनर्स्थापनेवजी कृषि क्षेत्रांच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि कृषि रचनेतील संबंधात बदल घडवून, शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून त्यांना स्वावलंबी बनवून, कृषी विकास घडवून आणण्यावर भर देतात (Jodhka, 2002).

डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतानुसार, "गाव म्हणजे शोषण आधारित जातीव्यवस्थेवर आधारलेले ग्रामीण समाजजीवनाचे एकक आहे. हे एकक म्हणजे हिंदू समाजव्यवस्थेची कार्यात्मक प्रतिक्रिया आहे. त्यांच्या मते, गावात अस्पृश्यांना स्थान नाही. त्यांना गावाबाहेर वाडी-वस्त्यात राहावे लागते. त्यांच्यासाठी ग्रामजीवन म्हणजे वंचितता, शोषण आणि अस्पृश्यतेचा अनुभव आहे. त्यामुळे ते गावांचा पुरस्कार करत नाहीत; पण गाव हे प्राचीन समाजव्यवस्थेचे सामाजिक, संस्कृतिक केंद्र असल्याचे ते मान्य करतात (Jodhka, 2002). डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गावास अवनती, भ्रष्टाचार आणि शोषणाने ओतप्रोत भरलेला उकिरडा मानतात आणि आजही गावाचे अस्तित्व टिकून आहे. कारण लोकांना अशा गावावाचून पर्याय नाही (Gupta, 2005). म्हणून ते अस्पृश्यांना गाव, गावकी सोडून शहरात स्थलांतर करण्याचा सल्ला देतात.

स्वातंत्रोत्तर काळात भारताच्या सुवर्ण भूतकाळाची चिकित्सा करताना एका बाजूला समाजशास्त्रज्ञ व सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी गाव म्हणजे 'एक स्वावलंबी स्वयंपूर्ण गणराज्य' या मिथकाची चिकित्सा करण्यासाठी प्रचंड प्रमाणात खेड्यांच्या क्षेत्रीय अभ्यासाला सुरुवात केली. ज्यात सहभागी कृतिशील निरीक्षणावर अधिक भर देण्यात आला, तर दुसऱ्या बाजूला भारत सरकारने आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी खेड्यांची अविकसित अवस्था घालवून त्यांना आधुनिक बनवण्यासाठी, तसेच आवश्यक नियोजन करण्यासाठी तथ्य संकलन व विश्लेषण यासाठी समाजशास्त्रज्ञांना पाचारण केले. यामुळे गाव हे

समाजशास्त्रज्ञांसाठी राष्ट्राचे सामाजिक, संस्कृतिक, आर्थिक जीवन समजून घेण्यासाठीचे पद्धतीशास्त्रीय प्रवेशद्वार ठरले (Chauhan, 1974; Berman, 1997; Thakur, 2014). तर काहींनी ते 'भारतीय समाज संरचनेच्या सार्वत्रिकतेबद्दलच्या सामन्यीकरणातील एक पद्धतीशास्त्रीय साधन जे बृहतविश्वाचे स्वंसिद्ध सूक्ष्म रूप आहे (Srinivas, 1955). गाव राष्ट्राचे सूक्ष्म प्रातीनिधीक एकक म्हणून बहुमोल अतिमहत्वाचे निरीक्षण केंद्र ठरले (Beteille, 1966). अलीकडे 'गाव एक अवकाश' (Space) म्हणून चिकित्सा करताना वास्तव मांडण्याचे ढोबळ प्रयत्न झाल्याचे दिसून येते (Niranjana, 1991). गाव अजूनही मागास, अंधश्रद्धेचे प्राबल्य असणारे, बदल नाकारणारा, कर्मठ, स्थितीशील असाच गृहीत धरला जातो.

१९५० ते १९६० च्या दशकात खूप मोठ्या प्रमाणावर ग्रामाभ्यास करण्यात आले. त्यात दोन गोष्टींवर भर देण्यात आला. एक प्राचीन भारतीय समाजाच्या स्वरूपाचे अभिलेखन करणे तर दुसरे सामाजिक संघटना आणि सांस्कृतीक जीवन समजून घेणे. सामाजिक शास्त्राच्या विकासाच्या अभ्यासासाठी रणनीती म्हणून भारतातील गाव हे नेहमीच भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिलेले आहे. भारताचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल, तर गावचा विकास होणे अभिप्रेत आहे (Beteille, 1996, 2006). 1955 हे वर्ष ग्रामभ्यासाच्या दृष्टीने खुप महत्वाचे राहिले आहे, या वर्षात S C Dube यांचे 'Indian Village', Mckim Marriot यांचे 'Village India', Srinivas यांचे 'India's Village' आणि D M Mujumdar यांचे 'Rural Profile' प्रकाशित झाले. या अभ्यासकांनी ग्रामीण समाज जीवनाची संरचना आणि सामाजिक बदल अभ्यासला. Srinivas यांच्या मते, सामाजिक बदलाच्या शक्तींच्या प्रभावाणे घडून येणाऱ्या स्थित्यंतरापूर्वीच संपूर्ण ग्रामीण समाजवास्तव नोंदवून घेणे हा अभ्यासाचा हेतु होता (Srinivas, 1955).

स्वातंत्र्योत्तर काळात विकासाच्या योजना आखण्यासाठी आवश्यक माहिती, तथ्य संकलन करण्यासाठी ग्राम अभ्यासाला चालना मिळाली. Srinivas यांच्या मते, या अभ्यासाचा भर ग्रामीण जनतेच्या आर्थिक समस्या नोंदविण्यावर होता, त्यामुळे या अभ्यासात ग्रामीण भागातील लोकांची भौतिक आणि आर्थिक संपन्नता केंद्रस्थानी राहिली. या ग्रामभ्यासात अर्थशास्त्रज्ञांनी गावांच्या सामाजिक, सांस्कृतीक घटनांकडे दुर्लक्ष केले, तर समाजशास्त्रज्ञ आणि सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी आर्थिक आणि वर्गीय घटकांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच Srinivas यांच्या मते, ग्रामीण समाज वास्तव समजून घेताना ग्रामीण समाज संरचना आणि ग्रामीण समाज जीवनातील बदल पूर्णपणे लक्षात आला नाही (Srinivas, 1975). S C Dube यांच्या मते, ग्रामीण जीवनाच्या शिस्तबद्ध बहुआयामी अभ्यासातून प्रभावी नियोजनासाठी आवश्यक महत्वपूर्ण तथ्ये उपलब्ध करून देता येते. त्यासाठी भौतिक, लोकसंख्यात्मक, ऐतिहासिक माहिती गोळा करून तिचा संबंध सामाजिक, आर्थिक, राजकीय, जात-प्रथा-परंपरेच्या संरचनेशी जोडून पहिलं तर गावाचे अधिक अर्थपूर्ण चित्र समोर येते (Dube, 2007). यासंदर्भात Yogesh Atal हे अभ्यासक दोन प्रश्न उपस्थित करतात. एक राष्ट्राचे प्रतिनिधित्व करू शकते का? आणि दूसरा हा की, गावासंदर्भात संकल्पनात्मक संदर्भ चौकट निश्चित करता येईल का? त्यांच्या या संदर्भातील प्रतिपादनात ते म्हणतात की,

गावांची निर्मिती प्रशासकीय सुलभतेसाठी करण्यात आली. त्यांच्या सीमा भौतिकदृष्ट्या निश्चित करण्यात आल्या पण हेही तितकेच खरे आहे की सांस्कृतीक सीमांना भौगोलिकतेची मर्यादा घालता येत नाही.

अशा प्रकारे खेड्यांच्या संदर्भात अनेक प्रकारचे अभ्यास झालेले आहे.

संकल्पनात्मक चौकट:

१. **विकास:**

समकालीन समाजशास्त्रात विकासाच्या अभ्यासाकडे (Development Studies) पुरेसे लक्ष दिले गेले नाही. आणि विकासाची प्रक्रिया समजून घेता येईल असा सुसंगत दृष्टीकोण अजूनही या ज्ञान शाखेत विकसित झाला नाही. समाजशास्त्राने सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाची कारणमीमांसा आणि परिणामाचा अभ्यास करून अपारंपरिक विकास योजनांच्या निर्मितीसाठी पुढे आले पाहिजे (Singh, 2014).पूर्वी विकास हा समाजशास्त्राचा मुख्य विषय (Core Themes) होता. अभिजात विचारवंतांनी जसे मार्क्स, वेबर, दरखीम यांनी समाज कृषी अर्थव्यवस्थेकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे कसं विकसित होत गेला व त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणाम काय होत गेले याच्या विश्लेषणातून योगदान दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर विकसनशील राष्ट्रात झालेली सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रगती समजून घेण्यासाठी आधुनिकीकरणाप्रमाणेच विकासाचे सुद्धा संकल्पनीकरण करण्यात आले. विकासाच्या संमिश्र आणि बहुआयामी स्वरूपामुळे विकासाची एकच सर्वव्यापक व्याख्या सापडत नाही. सामान्यपणे विकास हा समाजातील मूर्त व अमूर्त बदल ज्याचा विस्तार भूतकाळपेक्षा वर्तमानाला अधिक चांगला बनवलेला असतो. विकास ही समाजशास्त्रातील एक बहुआयामी, सापेक्ष व महत्वाची संकल्पना आहे. विकासाचे विविध दृष्टीकोण विकासाची व्याख्या वेगवेगळया प्रकारे करतात.

संयुक्त राष्ट्राच्या विकासात्मक कार्यक्रमांतर्गत विकासाची व्याख्या "दीर्घकालीन आरोग्यदायी जीवन, ज्ञानाची प्राप्ती, किमान जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी आवश्यक गरजांच्या पूर्ततेच्या स्त्रोतांची उपलब्धता आणि सामुदायिक जीवनामध्ये सहभाग वाढविणे" अशी केली आहे (Human Development Report, 2007). Michael P. Todaro म्हणतात की, "विकास म्हणजे आर्थिक विकासाबरोबर सामाजिक, संस्थात्मक, आणि प्रशासकीय सरंचनेबरोबरच लोकांच्या रूढी परंपरा आणि धारणांत झालेला आमुलाग्र बदल होय. विकास म्हणजे केवळ भौतिक परिस्थितीत बदल व लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे नव्हे तर या बरोबरच मानव विकास निर्देशकांतही वाढ व्हायला हवी" (Todaro, 1981). **अमर्त्य सेन** यांच्या मते, "विकास म्हणजे व्यक्तीच्या क्षमतांचा विकास, व्यक्ती तिच्या जीवनात असणाऱ्या धारणा व मूल्यांप्रती अभिप्रेत जीवन जगण्यासाठी आवश्यक क्षमता विकसित करण्याची संधी व आवश्यक परिस्थितीची उपलब्धता म्हणजे विकास होय" (Sen, 2001). तर जागतिक बँकेच्या मते, "विकास म्हणजे सद्यस्थितीत बदल करून मानवी जीवनात किंवा राहणीमानात त्वरित सुधारणा घडवून भविष्यात लोकांमधील क्षमता वाढविण्यासाठी केलेली कृती किंवा प्रक्रिया होय" (World Bank, 1992). विकासाकडे सामाजिक

विकासाच्या अनुषंगाने पाहता ‘ सामाजिक विकास म्हणजे समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि जात, वर्ण, वंश, संप्रदायिकता, लिंगभाव व धर्मातून येणारी कर्मठ, शोषणाधारित व्यवस्थेपासून मुक्त व्यक्तीवादी मूल्यव्यवस्था होय” (Singh, 2014). Dhanagare यांच्या मते, “विकासाची प्रक्रिया म्हणजे सर्वसामान्यांच्या जीवनात गुणात्मक बदल घडून येण्याची प्रक्रिया आहे” (Dhanagare, 2005).

२. **ग्रामीण विकास:**

ग्रामीण विकास ही ‘विकास’ या संकल्पनेतील उपकल्पना आहे त्याचा अर्थ ग्रामीण जनतेच्या एकूण जीवनमानाच्या दर्जात सुधारणा होणे हा आहे. विकास हे व्यक्ती, कुटूंब, समुदाय, राष्ट्र व पर्यायाने जगाचे अंतिम ध्येय्य आहे (Singh, 2009). विकास हे बदलाचे कारण आणि परिणाम आहे. यामध्ये दुहेरी सहसंबंध असतो. विकास हा बदलास प्रभावित करत असतो त्याचवेळी बदलापासून प्रभावितही होत असतो. हा बदल तंत्रज्ञानात्मक, आर्थिक, सामाजिक प्रवृत्तीतील संघटनात्मक आणि राजकीय असू शकतो. विकासामुळे कुठेतरी कधीनाकधी बदल घडून येतोच. पण या बदलामुळे नेहमीच विकास घडेल असे नाही. हा बदल काही घटकांसाठी चांगला (Development) किंवा काही घटकांसाठी वाईट (Retrogression) असू शकतो.

भारत सरकार ग्रामीण हा शब्द महसुलच्या संदर्भात वापरते. शासनासाठी गाव म्हणजे महसुली गावे गणले जाते. मग ते मोठं गाव असो व वाडी-तांड्यांचा समूह असो. जनगणना आयोगाने गावाची व्याख्या “ग्रामीण भागाचा मूलभूत घटक, महसुली गाव ज्याच्या बाह्य सीमारेखा निश्चित असतात. या महसुली गावात अनेक तांड्यांचा समावेश असू शकतो. पण या सर्वांचा समावेश जनगणनेत एकाच नावाखाली नोंद होते. जिथे सर्वेक्षण झाले नाही अशा जंगल व तत्सम भागात स्थानिक लोकांनी मानलेल्या सीमारेखांच्या आधारे प्रत्येक वनाधिकाराच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या वस्त्यांना एक गट मानले जाते” (Doshi & Jain, 2009). जागतिक बँकेने ग्रामीण विकासाची व्याख्या “ग्रामीण भागातील अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, कुळ अशा कृषक गरीब जनतेचा ज्यांचे चरीतार्थाचे साधन ग्रामीण भागातून येते त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी विशिष्ट रचनेवर व आराखड्यावर भर देणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय” (World Bank, 1975).

३. **शाश्वत विकास:**

शाश्वत विकासाच्या उदयाचा विचार करता असे आढळून येते की, १९७० च्या दशकात तत्कालीन विकासाची रणनीती आणि स्वरूप मानवी समाजास फायद्यापेक्षा नुकसानच जास्त पोचवणारी आहे याची नोंद घेतली गेली. निसर्गाचे व नैसर्गिक संसाधनाचे अमर्याद शोषण करणाऱ्या विकासाच्या आंधळया स्पर्धेतून जैवपरिसंस्थेतील असमतोल, पर्यावरणाचा-हास, पाणी आणि हवा प्रदूषण अशा समस्यांना जन्म देते. पुढे ऊर्जेच्या कमतरतेचा प्रश्न भेडसावतो. ऊर्जा जी विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधांनिर्मित अत्यंत महत्वाची आहे, तिचा तुटवडा भासायला लागतो व गती

मंदावते हे लक्षात घेतले गेले. यातून शाश्वत/चिरंतन विकास (Sustainable Development) या संकल्पनेचा उदय झाला. चिरंतन विकसवडी दृष्टीकोण म्हणजे विकासाची अशी पद्धत जी जीवनमानाचा दर्जा आणि पद्धतीमध्ये वृद्धी घडवून आणतानाच त्यातील विकास प्रक्रियेचे नकारात्मक परिणाम कमी करते. ही संकल्पना विकासाच्या संकल्पनेला विस्तृप्त बनवते. यात सामाजिक विकास, परिसंस्थांच्या संवर्धनाच्या संदर्भात जाणीवजागृती घडवणे आणि विकास प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचे परिणाम टाळण्यासाठी त्यांचे काळजीपूर्वक व्यवस्थापन करणे ज्यायोगे जीवजगतास संरक्षण मिळेल अशा सर्व गोष्टींचा समावेश असतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी व नैसर्गिक साधनसंपतीचे संवर्धन करण्यासाठी हरित चळवळ उभी राहीली. हरित चळवळीच्या माध्यमातून जनमाणसात पर्यावरणाशी संबंधित जाणीवजागृतीत वाढ झाली. नैसर्गिक साधनसंपती आणि प्राणिमात्रांचे संरक्षण करण्यासाठी ते पुढे आले.

धनागरे म्हणतात की, आर्थिक वृद्धी, पर्यावरणाचा-ऱ्हास, आणि दारिद्र्य यांचे दुष्टचक्र विकास प्रक्रियेत निर्माण होत असते व ते होऊ नये म्हणून ते विकासाला पर्याय म्हणून शाश्वत विकासाची आवश्यकता अधोरेखीत करतात. त्यांच्या मते, शाश्वत विकासासाठी पऱ्यावरणाचे अखंडत्व किंवा त्याचा समतोल, आर्थिक कार्यक्षमता, समता व सामाजिक न्याय या गोष्टींचा मेळ घालणे आवश्यक आहे. कारण शाश्वत विकास या संकल्पनेत जीवनमानातील गुणात्मक सुधारणेचा अनुभव अंततः सगळ्यांनाच मिळावा हे अभिप्रेत असते. हे मिळावे म्हणून संयम, सहिष्णुता आणि निग्रह ही तीन तत्वे शाश्वत विकासासाठी खरे आधारस्तंभ आहेत, त्यांचे पालनही केले पाहिजे (Dhanagare, 2005). याच संदर्भात गोपीकृष्ण म्हणतात की, 'शाश्वत विकास म्हणजे विकासाचा कार्यक्रम आणि धोरणांना अशा प्रकारे कार्यान्वित करणे, जेणेकरून वर्तमान व भविष्य या दोन्हीही कालखंडात पर्यावरण व नैसर्गिक संसाधनाचे नुकसान होणार नाही व विकास मात्र साधत राहील आणि त्यामुळे मानव जीवन सुरक्षित राहू शकेल (गोपीकृष्ण १९९९).

४. लोकसहभाग:

ग्रामीण विकासाच्या संदर्भात आता हे मान्य केले जाते की, ग्रामीण विकास म्हणजे केवळ कृषी उत्पादनात वाढ नव्हे, तर ग्रामीण भागाचा सर्वसमावेशक विकास होय. ज्यात ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर, सीमांत शेतकरी, छोटे शेतकरी, छोटे कारागीर, पारंपारिक हस्तकलाकार, स्थानिक लघुउद्योजक हे सर्व घटक ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती प्राप्त करून देतात या सर्व घटकांचा समावेश अपेक्षित आहे. १९५० च्या दशकात ग्रामीण जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी समुदाय विकास कार्यक्रम (Community Development Programme) आणला गेला. याला सरकार आणि कृषी कार्यक्रमांची जोड देण्यात आली पण या कार्यक्रमांना खूप मोठे अपयश आले. या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे या कार्यक्रमांमध्ये मोजक्या ग्रामीण अभिजनांचा अपवाद वगळता बहुसंख्य जनतेचा असहभाग होता (शर्मा, २०१३). या अनुभवातून समाजशास्त्रज्ञ, नियोजनकर्ते, नोकरशाह, बुद्धिवंत या निष्कर्षाप्रत आले की, ज्या लोकांसाठी या योजना राबवायच्या आहेत त्या लोकांच्या नजरेतूनच योजना समजावून घेतली तर अधिक लोकांच्या फायद्याची व परिणामकारक योजना आखून राबविता येईल. थोडक्यात, यातून लोकसहभाग अधोरेखित करण्यात आला.

विस्तृत अर्थाने लोकसहभाग म्हणजे विकास कार्यक्रमासंदर्भात लोकांना सचेतन बनवणे, त्यांच्या ग्रहणक्षमतेत व कौशल्यात वाढ घडवून आणणे आणि स्थानिक लोकांच्या पुढाकाराला प्रोत्साहित करणे. ग्रामीण विकासाच्या संदर्भात लोकसहभागामध्ये लोकांचा निर्णय, निर्धारण प्रक्रिया, योजनांची अंमलबजावणी, विकासाच्या योजनांच्या लाभांशाच्या वाटपात सहभाग आणि कार्यक्रमांच्या मुल्यमापनातील सहभाग इत्यादीचा समावेश होतो (ओकले, १९९१).

ग्रामीण विकासातील अनेक योजनांमध्ये ग्रामीण लोकांचा सहभाग असणे गरजेचे आहे. शासकीय तसेच अशासकीय पातळीवरील शासन प्रायोजित विकासाची अनेक कामे लोकसहभागातून केली जातात. उदा. आदर्श ग्राम योजना.

महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन पातळीवर अनेक प्रकारचे प्रयत्न चालू आहेत. विकासासाठी शासन अनेक योजना घेऊन येते. त्यातील काही यशस्वी होतात तर काही फोल ठरतात. यामध्ये शासनाने आदर्श गाव संकल्प व प्रकल्प योजना, यशवंत ग्राम समृध्द योजना (राज्यस्तरीय), समृध्द ग्राम विकास योजना, संसद आदर्श ग्राम योजना आणि त्याच धर्तीवर राज्यात (महाराष्ट्र) आमदार आदर्श ग्राम योजना आणि स्मार्ट ग्राम योजना अशा योजनांचा समावेश आहे. ग्रामीण विकासासाठी शासन अनेक पातळीवर काम करताना आपल्याला दिसून येते. यामाध्यमातून अनेक खेडे/ गाव आदर्श गाव म्हणून पुढे येताना दिसून येत आहेत. आदर्श गाव निर्माण झाले म्हणजे तेथल प्रश्न सुटले का? सरकारने विकासाचा भर हा मुलभूत/ पायाभूत गोष्टींवर दिला आहे का? आदर्श गावांमधील सामाजिक स्तरीकरण कसे आहे? तसेच तेथील सामाजिक गतिशीलता आणि सामाजिक परिवर्तन कसे होत आहे. याचे अध्ययन सदर अभ्यासातून आम्ही करण्याचे योजिले आहे.

संशोधन पद्धती:

सदर संशोधनाचा अभ्यास गुणात्मक संशोधन पद्धतीमधून करण्यात येणार आहे. सदर संशोधनात आदर्श गावांचे व्यष्टी अध्ययन करण्यात येणार आहे. संशोधन पद्धती म्हणून गुणात्मक मुलाखत, सहभागी निरीक्षण या तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. या संशोधनात महाराष्ट्रातील ग्रामीण विकासातील आदर्श गाव पुरस्कारप्राप्त आदर्श गावांची समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सा करण्यात येणार आहे. यासाठी संशोधनात भारतातील स्वातंत्र्यानंतरच्या विकासाचा तसेच ग्रामीण भागात झालेल्या विकासाचा आढावा घेण्यात येणार आहे.

गुणात्मक संशोधन पद्धती

सदर संशोधन गुणात्मक संशोधन पद्धतींचा उपयोग करून पूर्ण केले आहे. ॲलन ब्रायमन यांच्या मते, “संशोधनाची रणनीती म्हणून गुणात्मक संशोधनात आधारसामग्रीचे संकलन आणि विश्लेषण या दोन्हीत संख्यात्मकतेपेक्षा शब्दांना अधिक महत्व असते. या प्रकारच्या संशोधनात नैसर्गिक शास्त्रातील

नियमने व प्रारूपे नाकारलेली असतात. त्याऐवजी व्यक्ती त्यांच्या सामाजिक जगाचा अन्वय कसा लावतात, यावर भर दिलेला असतो. म्हणजेच सामाजिक वास्तवाचा अर्थ प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे लावत असते. तसेच व्यक्तिच्या मानसिक, भावनिक दृष्टिकोनात परिवर्तन झाल्यास सामाजिक वास्तवाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू शकते" (ब्रायमन, २००१; तांबे, २०१७). सदर संशोधनात तथ्य संकलन आणि विश्लेषण करतेवेळी संख्यात्मकतेपेक्षा शब्दांना आणि गुणात्मकतेला अधिक महत्व दिले आहे.

डेन्झिन व लिंकन यांच्या मते, गुणात्मक संशोधनात घटनांतील व्यक्तिनिष्ठता व गुणात्मकता समजून घेण्यावर भर असतो. हे संशोधन एकाचवेळी आंतरविद्याशाखीय परिदृष्टी, तंत्रे व पद्धती वापरणारे असते. यात संख्यांच्या मोजणीऐवजी प्रयोगिक पद्धतीने पडताळणीऐवजी अन्वयाला, अर्थमीमांसेला अधिक महत्व असते (डेन्झिन व लिंकन, २००२). या पद्धतीने संशोधनाच्या गुणात्मक निष्कर्षावर भर दिला जातो. जमवलेल्या माहितीचे वर्णन करणे, त्यांचा संबंध लावणे इत्यादीसाठी ही पद्धत उपयोगी पडते. गुणात्मक पद्धतीने तथ्य गोळा करता येतात तसेच त्याचे स्पष्टीकरण देता येते. गुणात्मक पद्धतीचा भर किती पुरावे मिळाले त्यापेक्षा कोणत्या प्रकारचे पुरावे मिळाले यावर असतो. त्यामुळे संशोधकाला खरी परिस्थिती समजून घ्यायला मदत होते. गुणात्मक पद्धतीत संशोधकाची भूमिका विश्लेषणात्मक असते (ब्रायमन, १९८८). सदर संशोधनामध्ये आम्ही गुणात्मकतेला अधिक महत्व दिले आहे. त्या दृष्टिकोनातूनच हे संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. स्वातंत्र्यानंतर भारतात झालेल्या ग्रामीण विकासाचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील आदर्श गावांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक आढावा घेणे.
३. आदर्श गावांमधील सामाजिक स्तरीकरण आणि सामाजिक गतिशीलता व परिवर्तन याचा चिकित्सक अभ्यास करणे.

संशोधन प्रश्न:

१. स्वातंत्र्यानंतर भारतात ग्रामीण विकास कशा प्रकारे झाला? ग्रामीण विकासातील स्थित्यंतरे कोणती?
२. ग्रामीण विकासाच्या योगदानात कोणकोणत्या विकासाच्या प्रारूपाचे योगदान होते?
३. महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाच्या योजनाचे परिणाम काय आहेत?
४. महाराष्ट्रातील आदर्श गाव योजना काय आहे?

५. आदर्श गावांमधील सामाजिक स्तरीकरण कशा स्वरूपाचे आहे?
६. आदर्श गावांमध्ये सामाजिक गतिशीलता आणि परिवर्तन कसे घडून येते?
७. आदर्श गावांमध्ये सामाजिक वंचितता आणि सामाजिक समावेशन कसे आहे?

तथ्य संकलनाची तंत्रे:

सदर संशोधनाचे तथ्य संकलन प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतांमध्ये गुणात्मक मुलाखत आणि सहभागी निरीक्षण तंत्रांचा उपयोग करणार आहोत. तसेच द्वितीय स्त्रोतांमध्ये वर्तमानपत्रे, सरकारी अहवाल, पुस्तके, संशोधन लेख, प्रकाशित व अप्रकाशित लेख ही साधने आहेत.

संशोधन क्षेत्र:

सदर संशोधनामध्ये महाराष्ट्रातील दोन आदर्श गावांचा प्रातिनिधिक स्तरावर व्यष्टी अध्ययनाच्या माध्यमातून समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास करण्याचे योजिले आहे. सदर गावे ही मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील पाटोदा हे आदर्श गाव आणि पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार आहेत.

नमुना निवड:

“महाराष्ट्रातील आदर्शगाव पुरस्कारप्राप्त आदर्श गावांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास” या संशोधनासाठी मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील पाटोदा हे आदर्श गाव आणि पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार नमुना निवडलेले आहे. सदर गावांची निवड ही असंभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड पद्धतीनुसार केलेली आहे.

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील आदर्श गाव पुरस्कार प्राप्त आदर्श गाव पाटोदा आणि आदर्श गाव हिवरे बाजार या आदर्श गावांचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक व्यष्टी अध्ययन करणार आहे.

आदर्शगाव पाटोदा:

पाटोदा हे गाव महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात आहे. पाटोदा या गावाला २०११ साली पर्यावरण विकासरत्न आणि निर्मल ग्राम पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते मिळाला आहे. तसेच या गावाला संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, दलित वस्ती सुधार योजना आणि ग्राम गौरव पुरस्कार अशा प्रकारची जिल्हा, विभागीय तसेच राज्यपातळीवरची अनेक पुरस्कार मिळालेली आहे. या गावाच्या विकासामध्ये गावाचे माजी सरपंच भास्करराव पेरे यांचे व गावातील सर्वच लोकांचे मोलाचे योगदान आहे.

आदर्श गाव हिवरे बाजार:

आदर्श गाव योजनेच्या माध्यमातून सर्वप्रथम महाराष्ट्र मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार गाव हे महाराष्ट्रातील सर्वप्रथम आदर्श गाव आहे या गावाला 15 ऑगस्ट 1994 रोजी आदर्श गाव म्हणून सन्मानित केले आहे. हिवरे बाजार गाव हे पहिले अतिशय दुष्काळी गाव होते. तिथे शेतीसाठी सुद्धा पाणी पुरत पुरत नसे. त्यामुळे येथील नागरिकांची स्थिती अतिशय खराब होती त्यांना रोजगार नसे. या गावातील सरपंच पोपटराव पवार यांनी गावाची परिस्थिती बदलली हे एक आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे पंधराशे

संख्या असणाऱ्या या गावात 95% साक्षर आहेत आदर्श गाव योजना ही गावांच्या विकासासाठी आर्थिक मदत करते.

व्यष्टी अध्ययन पद्धती:

व्यष्टी अध्ययन पद्धती ही गुणात्मक पद्धती आहे. समाजशास्त्रात व्यष्टी अध्ययन पद्धतीचा उपयोग सर्वप्रथम हर्बर्ट स्पेन्सर यांनी वेगवेगळया संस्कृतींच्या तुलनात्मक अभ्यासासाठी केला होता. व्यष्टी अध्ययन पद्धती म्हणजे व्यक्ती, गट, सामाजिक संस्था किंवा एखादा समुदाय यांचा गुणात्मक दृष्टिकोनातून सूक्ष्म पद्धतीने केलेला सखोल आणि परिपूर्ण अभ्यास होय (मार्शल, गॉर्डन, २००३). व्यष्टी अध्ययन पद्धतीविषयी पी. व्ही. यंग असे म्हणतात की, एखाद्या सामाजिक एककाचे संपूर्ण विश्लेषण करण्याची पद्धती होय. मग तो एकक व्यक्ती, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक समूह किंवा समुदाय होय.

जेंव्हा संशोधक एखाद्या एककाला त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या स्वरुपात परिपूर्ण रूपाने त्याचे अध्ययन करतो, तेंव्हा अशा अध्ययनास व्यष्टी अध्ययन असे म्हणतात. असे एकक एखादा व्यक्ती, कुटुंब, सामाजिक समूह, सामाजिक संस्था किंवा सामाजिक समुदाय असू शकतो.

काही लेखकांच्या मते व्यष्टी अध्ययन हे कमीत- कमी वेळात एखाद्या विशिष्ट समस्येच्या संदर्भात गहन स्वरूपाचा अभ्यास करू शकते. व्यष्टी अध्ययन विभिन्न उद्देशातून, वर्णनात्मक, अन्वेषणात्मक संशोधनाकरिता उपयोगात आणून त्याद्वारा सिद्धांत विकसित केला जातो.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रातील आदर्श गावांचा चिकित्सक अभ्यास केला जाणार असून त्याची मांडणी एकूण पाच प्रकरणांमध्ये केली जाणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

या शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये भारतातील ग्रामीण विकासाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पद्धती आणि संकल्पनात्मक चौकट

शोधनिबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन पद्धातीशास्त्र, संशोधनाच्या पद्धती, तथ्य संकलनाचे स्त्रोत यांची मांडणी केली जाणार आहे. तसेच सदर संशोधनासाठी आवश्यक असणारी समाजशास्त्रीय संकल्पनात्मक चौकट मांडण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

महाराष्ट्रातील आदर्श गाव संकल्पनेचा आढावा

शोधनिबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील आदर्श गाव संकल्पनेचा ऐतिहासिक आणि विकासात्मक आढावा घेतला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाच्या योजनांसंदर्भात चिकित्सक मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण चौथे

तथ्य विश्लेषण

शोधनिबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील आदर्श गाव पुरस्कारप्राप्त आदर्श गावांचे केलेले तथ्य संकलन याचे विश्लेषण करणार आहोत.

प्रकरण पाच

सारांश आणि निष्कर्ष

या शोधनिबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये सदर संशोधनाचा सारांश आणि महाराष्ट्रातील आदर्श गावांच्या संदर्भातील निष्कर्षांची मांडणी करणार आहोत.

संदर्भ ग्रंथसूची :

1. Atal, Y (ed). (2003): 'The Studies of the Village in India', in Yogesh Atal. Indian Sociology from Where: Footnotes to the History of the Discipline. Rawat Publications: Jaipur.
2. Beteille, A. (1966) Caste, Class and Power: Changing Patterns of Stratification in a Tanjore Village. University of California (Berkeley), Oxford University Press: Bombay.
3. Beteille, A. (2006): 'An Anthropologist in his Own Country', Keynote Adress. Diamond Jubilee Conference of Association of Social Anthropologists. Keele, April 2006, History of sociology Archive. www.unipune.ac.in/sns/cssh/HistorySociology/index.html
4. Bryman, A. (2001). Social Research Methods, Oxford University Press.
5. Chauhan B. R. (1974). 'Rural Studies: A Trend Report', in Indian Council of Social Science Research (ed.). "A survey of research in sociology and social anthropology: a project sponsored by the Indian Council of Social Sciences Research", New Delhi. (1974), Popular Prkashan: Bombay.
6. Corbetta, P. (2003). Social Research: Theory, Methods and techniques. Sage Publication.

7. Dhanagare D. N. (2004), Themes and Perspectives in Indian Sociology. Jiapur: Rawat.
8. Desai A. R. (1969). Rural Sociology in India. Mumbai: Popular Prkashan Pvt. Ltd.
9. Divya Joshi, (2002), Gandhiji on Villages, selected and complied with an introduced, Bombay sarvodaya mandal, 299 Tardeo road, Nana chowk, Mumbai-400007, India.
10. Doshi S. L. And Jain P. C. (2009). "Rural Sociology", Rawat Publications, Jaipur.
11. Dr. Rama Krishna V.V.S. (December 2016), Gandhian approach to rural development and decentralized planning, Volume: 6, Issue: 12, Indian Journal of Applied Research.
12. Dube S. C. (1955): Indian Village, Rutledge and Kegan Paul: London.
13. Hazare Anna, Pagare Ganesh, Lokur Vasudha. (1996). Adarsh Gaon Yojana: Government Participant in Peoples Programme. Hind Swaraj Trust: Pune.
14. Hazare, A. (1997) Ralegan Siddhi: A veritable transformation. Ralegan Siddhi Pariwar Prakashan.
15. Sharma, Mukul (2012), Green and Saffron Hindu Nationalism and Indian Environmental Politics, Permanent Black, Raniket.
16. Singh Sheobahal, (2014). "Sociology of Development Explorations and Trends". In Singh Yogendra (ed.) 2014, "Indian Sociology Development and Change", Oxford University Press: New Delhi.
17. Sen, A. (2001). "Development as freedom". Oxford Paperbacks.
18. Thakur, Manish. (2014). "Indian Village A Conceptual History", Rawat Publications, Jaipur.
19. आदर्श गावचा संकल्प व प्रकल्प महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : आगास १०९५/प्र.क्र. १६४/जल-२३, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १७ जानेवारी १९९६.
20. कुऱ्हाडे घ. गं., पागरे गणेश, लोकुर वसुधा (१९९६), आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प (महाराष्ट्र शासन) जनतेच्या कार्यात शासनाचा सहभाग, हिंद स्वराज ट्रस्ट प्रकाशन, पुणे.
21. घाटोळे रा.ना. (१९९७), समाजशास्त्रीय संशोधन: तत्व आणि पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
22. वारघडे सुरेशचंद्र, (२००५), "आदर्शगाव योजना संकल्प आणि सिद्धी", आदर्शगाव संकल्प आणि प्रकल्प प्रकाशन, पुणे.
23. सोमण मा.शं. (१९८४), संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
24. शासन निर्णय क्रमांक : आगास १०९५/प्र.क्र. १००/जल-२३, दिनांक : ६ नोव्हेंबर १९९५.

लेख:

1. Gupta, D. (2005): 'Whither the Indian Village: Culture and Agricuture in Rural India', Economic and Political Weekly, Vol. 40, No. 8 (Feb. 19-25, 2005), pp. 751-758.
2. Jodhka, S. S., (2002): "Nation and Village: Images of Rural India in Gandhi, Nehru and Ambedkar", Economic and Political Weekly, Vol. 37, No. 32 (Aug. 10-16, 2002), pp. 3343-3353.

3. Sangameswaran, Priya (2006), Equity in Watershed Development A Case study in Western Maharashtra, Economic and Political Weekly, Vol. 41, No. 21 (May 27- Jun. 2, 2006), pp. 2157-2165.
4. Sangameswaran, Priya, (2008), Community Formation, Ideal Villeges and Watershed Development in Western India, The Journal of Development Studies, 44:3, 384-408, March 2008, Routledge.
5. Srinivas, M. N. (1975). Village Studies, Participant Observation and Social Science Research in India, Economic and Political Weekly, Vol. No. 33/35, Special Number (Aug.) pp 1387+1389-1394.
6. गौतमी, रविकांत, ऑक्टोबर २०१४, "आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका", आपले आदर्शगाव, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प प्रकाशन, पुणे.

अहवाल:

1. संयुक्त राष्ट्र मानव विकास अहवाल, २००७.
2. World Bank, 1992, "Poverty Reduction Handbook", Washington D. C.
3. World Bank, 1975, "Rural Development Sector Policy Paper", Washington D. C.

संशोधक | संशोधन मार्गदर्शक

बालाजी नरवटे | डॉ. अनिलकुमार जायभाये